
MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2021 - Impact Factor : 7.479

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 7, Vol. II, Issue- LII, 29 March 2022

## ECONOMY



- Editor -

**Mrs. Pallavi Laxman Shete**

**Address for Correspondence**

*Mrs. Pallavi Laxman Shete*

Editor in Chief : Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Reffered)
Principal, Sanskriti Public School, Nanded (MH, India) Email : shrishprakashan2009@gmail.com

*Dr. Rajesh G. Umbarkar*

House No. 624 - Belanagar, Near Maruti Temple, Taroda (Kh.) Nanded - 431605 (India - Maharashtra)
Email - umbarkar.rajesh@yahoo.com, shrishprakashan2009@gmail.com Mob. No. 9623979067
Director : Mr. Tejas Rampurkar (For International Contacts only + 91-8857894082)

(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)

ISSN: 2454 – 7905

*SJIF Impact Factor:* 7 . 479

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

*A Peer Reviewed Referred Journal*

**Quarterly Research Journal**

(Arts-Humanities-Social Sciences- Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical-Ayurveda, Pharmaceutical, MSW, Journalism, Mass Communication, Library sci., Faculty's)

www.wiidrj.com

Vol. II ISSUE – LII Year – 7 29 March 2022

# Indian Economy : Opportunities and Challenges in 21st Centure

:: Editor ::

**Dr. M. V. Hiray**

:: Co - Editor ::

**Dr. D. N. Sonawane**

**Dr. B. M. Sonawane**

Address for Correspondence

**Mrs. Pallavi Laxman Shete**

Principal, Sanskrti Public School, Nanded.(MH. India)

**Website: www.wiidrj.com**

House No.624 - Belanagar, Near Maruti Temple, Taroda (KH), Nanded – 431605 (India - Maharashtra) **Email:** Shrishprakashan2009@gmil.com umbarkar.rajesh@yahoo.com

Dr. Rajesh G. Umbarkar Mob. No: +91-9623979067

✓
✓





| | | | |
|---|---|---|---|
| 47. | नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन व शाश्वत विकास काळाची गरज | डॉ. काळनर सुनिता | 212 |
| 48. | नाशिक जिल्ह्याच्या आर्थिक विकासात नैसर्गिक साधनसंपत्तीची भुमिका | नामदेव कारभारी डफळ<br>प्रा. डॉ. सुहास आव्हाड | 217 |
| 49. | नासिक जिल्ह्यातील जलसिंचनाचा झालेला विकास" एक भौगोलिक अध्ययन. (महाराष्ट्र) | भगवान श्याम भाऊ निकम | 223 |
| 50. | नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी लोकसंख्या बदलाचा चिकित्सक अभ्यास (सन १९७१ -२०११) | डॉ. अनिल डी. पवार | 228 |
| 51. | भारतातील बँकिंग आणिवित्तीयक्षेत्र: सिंहावलोकन | भुषण तात्यासाहेब शिरोळे | 231 |
| 52. | कृषी विपणन आणि त्यातील समस्या | श्वेताली देविदास सोनवणे | 237 |
| 53. | भारतातील बँकिंग क्षेत्रातील बदलांचे अवलोकन | गणेश बळवंत वाघ | 240 |
| 54. | कच्चा तेलाच्या किंमती आणिभारतीय अर्थव्यवसस्था | प्रा. डॉ. एस. एन. बोढरे<br>प्रा. के. एस. चौधरी | 243 |
| 55. | "महाराष्ट्रातील सर्व शिक्षा अभियान योजनेचे मूल्यमापन" | ज्ञानदेव सुभाषकूवर | 247 |
| 56. | ग्रामीण विकासातील नाबार्डच्या भूमिका | पूजा बाळू उशीर | 250 |
| 57. | कृषी विपणन प्रक्रियेत होणाऱ्या बदलांचे आर्थिक विश्लेषण | समर्थ शरद गोऱ्हे | 253 |
| 58. | ग्रामीण भागामध्ये आर्थिक समावेशन साध्य करण्यात व्यवसाय प्रतिनिधींच्या भूमिकेचाचिकित्सक अभ्यास | योगेश लक्ष्मण भारस्कर<br>डॉ. आशालता सोनवणे | 256 |
| 59. | भारतीय आरोग्य विमा (Health insurance ) | तुषार बापू पवार | 260 |
| 60. | उद्योजकता : बेरोजगारी दूर करण्यासाठी काळाची गरज | प्रा.उदय खंडू टेके<br>डॉ.सोमनाथ भागा सानप | 264 |
| 61. | भारतीय आर्थिक सुधारणा | जीवन अशोक गुंजाळ | 268 |
| 62. | ई–बॅकींग मधील आधुनिक प्रवाह ✓ | प्रा. डॉ. सावंत रजनी नामदेवराव | 271 |
| 63. | महिला सबलीकरणात शासनाच्या उपाययोजना | डॉ. नानासाहेब बी. दाभाडे | 274 |
| 64. | केंद्र – राज्य आर्थिक संबंध : सिंहावलोकन | Wadge Kunal Dipak. | 278 |
| 65. | शेती तंत्रज्ञान व उत्पादकता | श्री. संदिप नारायण अहिरे | 283 |
| 66. | कृषी व्यापार व व्यावसायिक दृष्टीकोन : एक काळाची गरज | डॉ. डी. व्ही. हारगिले | 287 |
| 67. | भारतातील ग्रामीण विकासाची दशा आणि दिशा | प्रा. अमोल पर्वत गरुड | 291 |
| 68. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आर्थीक-सामाजिक सुधारणा | श्रुती उमेश दोडे | 297 |
| 69. | बजेट२०२२ :देशाच्या उज्वल भवितव्याचा योग्य मापदंड-सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन! | जाधव रूपाली निवृत्ती<br>डॉ. अमोल गायकवाड | 302 |
| 70. | भारतीय शेतीच्या शाश्वत विकासासाठी आधुनिकीकरण | डॉ. एस. पी. देवरे | 305 |
| 71. | वित्त आयोग व केंद्र - राज्य राजकीय - वित्तीय सहसंबंध ✓ | प्रा. एन. ए.पाटील | 308 |
| 72. | ऑनलाईन-ऑफलाईन संमिश्र शिक्षण पद्धतीचे सहअस्तित्व : काळाची गरज | प्रा. बी. एस. निकम | 313 |
| 73. | भारतातील बँकिंग आणि वित्तीयक्षेत्र: सिंहावलोकन | दिनेश नाना कुंभार | 317 |

# वित्त आयोग व केंद्र-राज्य राजकीय – वित्तीय सहसंबंध

प्रा. एन. ए. पाटील

सहायक प्राध्यापक, राज्यशास्त्र महिला रत्नपुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय मालेगाव कॅम्प, ता. मालेगाव जि. नाशिक

**प्रस्तावना :-**

वित्त हे आधुनिक प्रशासनाचे रक्त असून, योजना कालावधीत खर्च व आपत्ती कालखंडात राज्य हे केंद्र सरकारच्या अनुदानावर निर्भर असतात. संघ आणि राज्याचे प्रशासन सुरळीत चालावे, त्यांच्यात समन्वय आणि सहकार्य निर्माण होण्यासाठी त्यातया राज्यांना आपली जबावदारी पारपाडण्यासाठी योग्य अशी आर्थिक परिस्थिती असणे आवश्यक आहे. त्याकरिता राज्यांना आर्थिक स्वयंपूर्णता असणे महत्व पूर्ण आहे. वर्तमान कालावधीत आर्थिक व राजकीय संबंध राज्याच्या संघर्षाचा केंद्र बिंदू बनला आहे. राजकोषीय धोरणाच्या उत्तम अंमलबजावणी वर व संविधानाने बहाल केलेल्या केंद्र व राज्य यांच्यातील संसाधन वाटपावर केंद्र व राज्य वित्तीय संबंधातील यश अपयश निश्चित होत असते. संविधानाने केंद्र आणि राज्ययांना वेगवेगळया कराचे आकारणी व वसूल करण्याचे अधिकार दिले आहेत. तसेच त्याच्या विभजनाच्या तरतूद ही केली आहे. त्याच प्रमाणे अडचणीच्या कालावधीत राज्य हे केंद्राकडे मदतीचा हात मागू शकतात ज्या द्वारे राज्या-राज्यांमध्ये असणारा असमतोल दूर व्हावा हा मुख्य उद्देश आहे. सार्वजनिक सत्तेद्वारे पूर्व निर्धारित उद्दिष्ट गाठण्यासाठी सार्वजनिक उत्पन्न, सार्वजनिक खर्च, सार्वजनिक कर्ज यांचा उपयोग करून राजकोषीय धोरणाला कसे यश प्राप्त होईल हा प्रयत्न केला जातो. सार्वजनिक धोरणांचा नागरिकांच्या खर्चावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या परिणाम घडून येतो. त्याचा देशातील नागरिकांच्या खर्चावर व उत्पन्नावर परिणाम होतो

भारतीय संविधानानुसार भारत एक 'संघराज्य' आहे असा उलेख नसून भारत 'एक राज्यांचा संघ' आहे. असा शब्द प्रयोग आढळतो. राज्याच्या हक्कांना बाधा न येता राष्ट्रीय ऐक्य आणि सामर्थ्य यांची संप्राप्ती व्हावी म्हणून केलेले राजकीय संयोजन म्हणजे संघराज्य होय. भारताच्या संविधान भाग १२मध्ये कलम २६८ पासून २९३ पर्यंत केंद्र व राज्य संबंधाची चर्चा करण्यात आली आहे. सदर शोध निबंधामध्ये केंद्र व राज्य वित्तीय व राजकीय सहसंबंधाची चर्चा करण्यात आली आहे.

**संशोधन पद्धती :-**

सदर शोध निबंधाची माडणी करण्या करिता विश्लेषण पद्धती व दुय्यम साधन सामुग्री वापरण्यात आली असून, पुस्तके, संकेतस्थळे, वर्तमानपत्र, इ. चा. वापार करण्यात आला आहे.

**उद्दिष्टे :-**

१) वित्त आयोगांनी केंद्र व राज्य सरकारे यांना वित्तीय साधनाचे वाटप कसे केले आहे हे अभ्यासणे.

२) राजकोषीय नीतीचा अवलंब करून केंद्र व राज्यांमध्ये कशा प्रकारे समतोल साधण्याचा प्रयत्न केला जातो ते शोधणे.

३) केंद्र राज्य वित्तीय समायोजन प्रक्रिया समजून घेणे.

**विषय विवेचन :-**

विषय मांडणी करताना संविधान, सरकार व राजकोषीय निती या बाबी समोर ठेऊन उदिष्ठांची परिपूर्तता कशी पूर्ण होते यांचे विश्लेषण केले गेले आहे. कॅनडा व ऑस्ट्रेलिया या देशात कराची क्षेत्र वाढून दिल्यामुळे केंद्राच्या वाट्याला फार थोडे विषय आले. म्हणून केंद्रात राज्यांकडून आर्थिक मदत घ्यावी लागते. या उलट स्विझरलॅंड मध्ये परिस्थिती असून, अमेरिकेत सुरूवाती पासूनच आर्थिक स्वायत्तता असावी असे धोरण स्वीकारण्यात आले आहे. केंद्र किंवा राज्यात आर्थिक केंद्री करणामुळे स्वायत्ततेचा ऱ्हास होतो हा दृष्टिकोन समोर ठेवून भारतात दोन्ही मधील मार्ग स्वीकारण्यात आला आहे. भारत एक संघराज्य असून संघसुची व राज्यसूची माध्यमातून राज्य व केंद्र यांच्यातील महसूल व कर संदर्भात अधिकार निश्चित केले आहेत. समवर्ती सूचीत कोणत्याच कराचा समावेश नाही. केंद्राकडे संरक्षण, रेल्वे, टपाल, तार, राज्यांकडे न्याय, सुव्यवस्था, शेती, सहकार, शिक्षण, सार्वजनिक आरोग्य इत्यादी कार्य सोपवली आहेत. केंद्र व राज्य सरकार यांना आपले कार्य कार्यक्षमतेने करता यावी म्हणून उत्पन्नाच्या बाबी विभागून दिल्या जातात. त्यांच्यातील वित्तीय संबंधांच्या प्रश्नांचा ठराविक कालावधी नंतर पुन्हा पुन्हा विचार करावा लागतो त्याचा आढावा घेऊन त्या संबंधात योग्य बदल सुचविण्याचे कार्य वित्त आयोगाकडून केले जाते. कलम २८० नुसार दर ५ वर्षांनी राष्ट्रपती वित्त आयोगाची नेमनुक करतात. कलम २८० (३) नुसार आयोग खालील बाबी विषयक सल्ला देण्याचे काम करत असतो.

१) केंद्रिय करा पैकी ज्या कर उत्पन्नाची विभागणी केंद्र आणि घटकराज्य सरकार यांच्यात करावयाची असते त्यांचा हिस्सा ठरविणे.

२) केंद्र सरकारच्या संचित निधि मधील राज्यांना देण्यात येणारे सहाय्यक अनुदान तत्त्व निश्चित करणे.

तसेच इतर वित्तीय बावी संदर्भातील शिफारसी वित्त आयोग करत असतो. के. सी. नि योगी यांच्या अध्यक्षते खाली प्रथम वित्त आयोगाची नेमणूक करण्यात आली होती. आता पर्यंत एकूण १५ वित्त आयोगानी आपले अहवाल सदर केले आहेत. १५व्या वित्त आयोगाचे अध्यक्ष एन. के. सिंह यांनी २०२१-२२ ते २०२५ -२६ वर्षासाठी आपला रिपोर्ट शासनास सादर केला त्यात त्यांनी राज्याच्या करा मधील हिस्सा १४ व्या वित्त आयोगा पेक्षा एक टक्याने कमी ४१% इतका केला. व केंद्राच्या सुरक्षा व इतर गरजांसाठी १% वाढ केली. वित्त आयोग एक अर्ध न्यायिक संस्था आहे. त्याच्या शिफारशीचे पालन करणे सरकारला बंधनकारक नसते. तरी त्यांचे महत्त्व कमी होत नाही.

मागील तीन वित्त आयोगांचा राज्यान मध्ये कररचनेच्या विभागणीसाठी खालील सूत्राचा वापर केला आहे. व त्याचा भार खालील तक्त्यात दर्शविला आहे :-

| भारवितरण (%) | | | |
|---|---|---|---|
| परिवर्तनीयघटक | १३वावित्तआयोग | १४वावित्तआयोग | १५वावित्तआयोग |
| लोकसंख्येच्या (१९७१) | २५ | १७.५ | ०० |
| लोकसंख्या (२०११) | ० | १० | १५ |
| राजकोषीयक्षमता/आयवितरण | ४७.५ | ५० | ४५ |
| क्षेत्रफळ | १० | १५ | १५ |
| वनक्षेत्र | ०० | ७.५ | १० |
| राजकोषीयशिस्त | १७.५ | ०० | २.५ |
| जनसांख्यिकी | ०० | ०० | १२.५ |
| एकूणभार | १०० | १०० | १०० |

तक्ता क्र. १

१३ व्या, १४ व्या व १५व्या वित्त आयोगाने क्रमशः केंद्रिय कराच्या विभाजन योग्य करा पैकी ३२%, ४२% व ४१% इतका हिस्सा राज्य व केंद्र शासित प्रदेशांना द्यावा असे आपल्या शिफारशीत सांगितले आहे.१४व्या वित्त आयोगाने १०% इतकी मोठी विभाजन योग्य करामध्ये वाढ सुचवली होती. सरकारला घटनेत तरतुद केल्या प्रमाणे उत्पन्नाची चार वर्ग पडले जातात.

संघसूची मध्ये राज्य व केंद्र सरकार यांच्यात करआकारणी, वसुली, व वाटप संदर्भात संविधाना नुसार करण्यात आलेल्या तरतुदी :-

१) असे कर जे केंद्राद्वारे आकारले जातात व राज्य वसूल करते व मिळणारे उत्पन्न राज्यांना दिले जाते. (कलम२६८)

२) असे कर जे केंद्र आकरते व वसूल करते आणि उत्पन्न राज्यांना दिले जाते. (कलम२६९)

३) सेवा कर आकारणी केंद्र कर ते व वसुली केंद्र व राज्यांकडून केली जाते. व उत्पन्न विभागणी राज्य व केंद्रामध्ये केली जाते.(२६८/A)

४) असे कर जे केंद्राकडून आकारले व वसूल केले जातात मात्र ज्यांचे उत्पन्न राज्यांना मिळते. (कलम२६९)

वरील घटनात्मक तरतुदींचा व वित्त आयोग शिफारशीचा वापर करून केंद्र व राज्य सरकारे यांच्यात कर उत्पन्नाचे वाटप केले जाते. तसेच राज्य घटनेत त्या घटकांचाही उलेख करण्यात आला आला आहे. वित्त आयोग ज्या

शिफारशी करतो त्या सरकारसाठी मार्गदर्शक ठरत असतात. याप्रमाणे विभाजन योग्य उत्पन्न निश्चिती व त्या वरून राज्य व केंद्राचा'रुपयामध्ये हिस्सा निश्चित होत असतो.

सहाय्यक अनुदान :-

भारतीय संविधानानुसार **अनुसूची II** मध्ये राज्याला कल्याण व विकासासंबंधी महत्त्व पूर्ण कार्य सोपविली आहेत. त्याची पूर्तता करता यावी म्हणून संविधाना नुसार राज्याला केंद्राकडून अनुदान प्राप्त करून घेता येते. राज्याला आपला चालू खात्यावरील घाटा पूर्ण करण्याकरिता, तसेच आंतरराज्य असमानता दूर करण्यासाठी सहाय्यता अनुदान मागासलेल्या राज्यांना दिली जातात, जसे, शिक्षण, आरोग्य या सुविधांना प्रोत्साहन देणे. वित्त आयोग कलम २७५ अनुसार पंचवार्षिक योजनेत सहायता अनुदान संबंधित शिफारस करत असतो. (कलम २८२ नुसार केंद्र आणि राज्यांना सहाय्यक अनुदानाची तरतूद आहे. आसाम, बिहार, ओरिसा, आणि प. बंगाल यांना ताग उत्पादनाच्या निर्यातीवर नफ्याच्या मोबदल्यात सहाय्यक अनुदान देण्याची तरतूद संविधानात आहे). भारताच्या संचित निधीतून या अनुदानाची तरतुद केली जाते.

निष्कर्ष :-

१) राष्ट्रपती दर पाच वर्षासाठी वित्त आयोगाची नेमणूक करतात. राष्ट्रपतींच्या सूचने नुसार वित्त आयोग काम करत असतो

२) केंद्र सरकारने महसुलातील वाटा, अनुदाने राज्यांना किती द्यावेत, राज्या-राज्यांना कशी वितरित करावी हे सुचवण्यासाठी दर पाच वर्षासाठी वित्त आयोग विविध निकष सुचवत असते.

३) भारतीय राज्यघटनेने केंद्रशासनाला उत्पन्नाचे अधिक साधने उपलब्ध करून दिले आहेत. त्यामुळे राज्यांना आपला विकास साध्य करण्यास अडचणी येतात. त्या करिता वित्त आयोगाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

४) वित्त आयोग अर्ध न्यायिक संस्था असून त्याच्या शिफारशी सरकारवर बंधनकारक नसतात. परंतु, त्यासरकारसाठी मार्गदर्शक ठरतात.

५) पंधराव्या वित्त आयोगाने २०११ ची लोकसंख्या भार वितरणासाठी गृहीत धरले. यापूर्वीच्या आयोगाने 1971 ची लोकसंख्या गृहीत धरली होती.

६) भारतीय संविधाना नुसार केंद्र सरकारला जास्त उत्पन्नाची साधने उपलब्ध आहेत. व त्याच्या विभाजनाच्या संदर्भात लवचिक धोरणाचा अवलंब करण्यात आला आहे.

७) राज्य सरकार अडचणीच्या कालावधीत केंद्र सरकारकडून सहाय्यक अनुदान मिळवु शकते. येथे केंद्र व राज्य यांच्यात राजकीय व आर्थिक संघर्ष दिसून येतो. भारत सरकारच्या संचित निधीतून त्याची तरतूद केली जाते.

८) 'भारत 'संघराज्य' या शब्दाचा उल्लेख न करता, 'राज्यांचा संघ असेल' असे राज्य घटनेच्या कलम एक मध्ये म्हटले आहे. वित्त आयोग व केंद्र राज्य राजकीय आर्थिक संबंध यातून लक्षात येतो.

सारांश :

केंद्र व देशातील राज्यात वेगळया वेगळया राजकीय पक्षाच्या सत्ता सत्तेवर असतात. त्यांच्यात राजकीय संघर्ष असतो त्यामुळे भारतीय राज्यघटनेत असलेल्या लवचिक पणा तसेच वित्त आयोगा सारखी मार्गदर्शन करणारी यंत्रणा यामुळे वित्तीय समायोजन द्वारे राज्यांच्या मध्ये असणारा असमतोल दूर करता येतो. तसेच वित्तीय समायोजन साध्य होते.

संदर्भ:

१) भारतीयराज्यघटनास्वरूपवराजकारण - प्रा. चि. ग.घांगरेकर- श्रीमंगेशप्रकाशननागपूर

२) इंडियनपॉलिटी - एम. लक्ष्मीकांत - के. सागर

३) भारतीयराजकियव्यवस्था - वोराळकर,जोशी, चोपडे- पिंपळापुरे□डक.पब्लिश.नागपूर

४) भारतीयअर्थव्यवस्था - रंजनकोळंबे - भगीरथप्रकाशन

५) https://www.indiabudget.gov.in

६) https://fincomindia.nic.in

७) https://pib.gov.in